गुड बॅड अगली



राजू परुळेकर

**शिवसेनेचे राडे जेव्हा जोरात होते तेव्हा त्याचे बळी मराठी माणसं जास्त होती. मराठी माणसाला, मराठी भाषेला, मराठी संगीत-नाटक-चित्रकलेला किंवा खाद्य संस्कृतीला अभिमान वाटावा असं गेल्या चाळीस वर्षांत शिवसेनेने सत्ता भोगूनही काहीही केलेलं नाही.**

# शिवसेनेच्या राड्याचा 'डीएनए'


शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेमध्ये दादर भागात काही दिवसांपूर्वी एक राडा झाला. त्या राड्यावर अनेकांना वेगवेगळ्या प्रकारचे कढ आले. त्यातला एक कढ मराठी माणसाबद्दलच्या चिंतेचा होता. मूळ राडा आणि मराठी माणसाबद्दलची चिंता या दोन्हीही भिन्न गोष्टी आहेत. शिवसेनेच्या स्थापनेनंतर लगेचच शिवसेनेने मराठी माणसासाठी म्हणून राडे करायला सुरुवात केली. या राड्यांमुळे मराठी माणसांची पत सुधारणार आहे किंवा मराठी माणसांचा मुंबईत एकहाती अंमल सुरू होऊन टिकणार आहे, अशी त्या काळी भावना होती. आजही बऱ्याच जणांना मुंबईत मराठी माणूस टिकला ते शिवसेनेमुळेच असं वाटतं अर्थात या भावनेचं वास्तविक मूल्यमापन आजवर कुणी केलेलं नाही. शिवसेना स्थापनेनंतर चाळीस वर्षांनी तरी




या साऱ्याचं मूल्यमापन व्हायला हवं. निदान शिवसेना आणि मनसेमधल्या या राड्याच्या निमित्ताने तरी.

मुंबईत या चाळीस वर्षांत मराठी माणूस टिकला म्हणजे काय? काँग्रेस फुटली की असे राडे होत नाहीत. समाजवादी पक्ष फुटल्यावर असे राडे होत नाहीत. पण शिवसेना फुटल्यावर (खऱ्या अर्थाने फुटल्यावर) असे राडे होतात याचा अर्थ काय? या दोन प्रश्नांचा अनोन्य संबंध आहे. वास्तवात या प्रश्नांची जी उत्तरं आहेत त्यातच शिवसेनेच्या सर्व दाव्यांची (आणि शिवसेनेच्या वतीने केल्या गेलेल्या दाव्यांची) उत्तरं लपलेली आहेत.

दहशतीने कोणत्याही समाजगटाची सत्ता सर्वकाळ प्रस्थापित होऊ शकत नाही. राजकीय दहशतीच्या जोडीला प्रचंड सृजनशील कार्य नसेल तर ती राजकीय दहशत त्या विचाराला मागेच घेऊन जाते. पुन्हा त्या राजकीय दहशतीला जर त्या संबंधित समाजाचा पाठिंबा असेल तर त्यातून फक्त त्या समाजाचा न्यूनगंड



अधोरेखित होतो. जो शिवसेनेच्या संदर्भात मराठी समाजाचा झाला. चाळीस वर्षांत मराठी माणूस, मराठी भाषा, मराठी संस्कृती, मराठी खाद्य जीवन यांचा मुंबईतच नव्हे तर महाराष्ट्रातही ऱ्हास होत गेला. नेमक्या याच काळात शिवसेना वाढत गेली. बाळासाहेब नेहमीच मराठी माणसाला शिवसेनेच्या मागे एकमुखाने उभं न राहण्याबद्दल दोष देत आलेले आहेत. म्हणजे काय? तर शिवसेनेचं वस्तुनिष्ठ मूल्यमापन करण्याला 'मराठीविरोध' असं सोपं- सुटसुटीत नाव बाळासाहेबांनी दिलं. गंमत म्हणजे त्यांच्या या कृतीचा अर्थ आणि त्यातून निर्माण झालेले पेच हे चाळीस वर्षांत कुणाच्या नीट लक्षात आले नाहीत. एवढंच नव्हे तर सत्तेवर आली तेव्हा शिवसेनेने मराठी समाजाच्या, मराठी भाषेच्या हितासाठी कोणते निर्णय घेतले? हे प्रश्नसुद्धा 'मराठीविरोध' या कॅटॅगरीत आपण जाऊ या भयाने किंवा अपराधगंडाने माणसं करायला धजावेनात. त्यामुळे शिवसेनेच्या धोरणाला समाजवाद्यांव्यतिरिक्त कुणीच विरोध करेना. समाजवादी सर्वच निर्माण होणाऱ्या आणि सृजनाच्या शक्यतांना विध्वंसक विरोध करतात. त्यामुळे त्यांच्या संधिसाधू विरोधाला कुणीच गंभीरपणे घेईना! संधिसाधू अशासाठी की, शिवसेनेशी पहिली राजकीय युती समाजवाद्यांनीच केलेलीच होती! शिवसेनेवर कोणत्याही प्रकारचा हल्ला म्हणजे मराठी माणसावर आणि समाजावर हल्ला ही एक प्रकारची प्रचाराची स्ट्रॅटेजी आहे आणि ती अनेक विचार न करता जगणाऱ्या मराठी माणसांनी यशस्वी केलेली आहे.



वास्तविक कोणत्याही समाजाचं अस्तित्व आणि प्रतिष्ठा ही त्या समाजाच्या भाषेच्या प्रतिष्ठेवर अवलंबून असते. भाषा हे व्यक्त करण्याचे सर्वात महत्त्वाचे आणि आद्य साधन आहे. शिवसेना वाढण्याच्या आणि बहरण्याच्या काळात मुंबईत मराठी भाषेला काहीच स्थान राहिले नाही. शिवसेनेच्या अजेंड्यावर मराठी भाषेसंबंधी कधीच काही नव्हतं. खरं तर प. बंगालमध्ये बंगाली कम्युनिस्टांनी आणि केरळमध्ये मल्याळी कम्युनिस्टांनी या दोन भाषांना त्या त्या राज्यात, देशात आणि जगात जे स्थान प्राप्त करून दिलं त्याची गंधवार्ताही शिवसेनेला प्रादेशिक आणि भाषिक आवाहनं करताना नव्हती. केरळमध्ये 'मल्याळी भाषा परिषद'सारखी संस्था स्थापन केली गेली. इतर देशी आणि आंतरराष्ट्रीय भाषांतून मल्याळममध्ये पुस्तकं भाषांतरित होतात आणि मल्याळममधून या इतर भाषात पुस्तकं भाषांतरित होतात. भाषाविषयक संशोधन या आणि इतर अशाच संस्थांमधून निरंतन होत राहतं. शिवसेना मराठीचं नाव सांगते आणि त्या जोरावर तिने अनेक पातळ्यांवर सत्ता उपभोगलेली आहे. तिने मुंबईत (आणि महाराष्ट्रात) मराठी भाषा समृद्ध होण्याकरिता काय केलं? तर काहीच नाही.

आज मुंबईची बोलीभाषा मराठी नाही. मुंबईकरांची मातृभाषा मराठी नाही. अमराठी शाळांमध्ये मराठी भाषा आज टिकवायची असेल तर त्याची चर्चासुद्धा मराठी माणसं दबक्या आवाजात करतात. मराठी माणसांना आज मुंबईत राहताना मराठी असण्याबद्दल न्यूनगंड वाटतो. शिवसेनेच्या राड्याची चाळीस वर्षे उलटून गेल्यावरची त्याची फलश्रुती ही अशी आहे. या राडा संस्कृतीच्या सुरुवातीपासून ते या राडा संस्कृतीची दहशत पातळ होत गेली तोवर कृष्णा देसाईपासून ते खोपकरांपर्यंत अनेक माणसं या संस्कृतीचा हल्ला झेलत गेली ती सर्व मराठीच होती.

'महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यालयावर शिवसेनेने केलेला हल्ला आणि नंतर झालेली दंगल ही मराठी माणसाने मराठी माणसावर केलेल्या हल्ल्याचा आणि आपसात डोकी फोडण्याच्या प्रकाराचा नमुना आहे.' हा शिवसेनेच्या जुन्या प्रचाराचा नमुना आहे. राडा करायचा आणि शाब्दिक वा शारीरिक प्रतिक्रिया उलटून परत आली तर तो मराठी माणसावरचा हल्ला होय. असा कांगावा करायचा ही शिवसेनेची जुनी नीती आहे. बाळासाहेब ठाकरेंनी ही नीती त्यांच्या बहराच्या काळात यशस्वीपणे वापरली. परंतु आता हा प्रचार केविलवाणा वाटतो. एक तर शिवसेनेने गेल्या कित्येक वर्षे मराठी माणसाऐवजी छतपूजा आपलीशी केलेली होती. दुसरं म्हणजे शिवसेनेचे राडे जेव्हा जोरात होते तेव्हाही त्याचे बळी मराठी माणसंच जास्त होत होती. सर्वात महत्त्वाचं म्हणजे मराठी माणसाला, मराठी भाषेला, मराठी संगीत, नाटक, चित्रकलेला किंवा मराठी खाद्यसंस्कृतीला अभिमानबिंदू वाटावा असं गेल्या चाळीस वर्षांत शिवसेनेने सर्व पातळ्यांवर सत्ता भोगूनही काहीही निर्माण केलं नाही. भाऊ पाध्ये नावाच्या श्रेष्ठ लेखकाने त्याची 'राडा' नावाची कादंबरी लिहून शिवसेनेचं अंतर्गत आणि बाह्य मूल्यविषयक पतन ज्या द्रष्टेपणाने नोंदवलं त्याला *Hats off* करण्याची वेळ आलेली आहे.

राहता राहिली महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची भूमिका. आपल्या मुख्य कार्यालयावर हल्ला होताना ते तटस्थ राहिले असते तर त्यांची राजकीय प्रतिष्ठा काय राहिली असती? आमचेच मराठी बांधव होते म्हणून आम्ही मार खाल्ला. असं कारण मराठी माणसांनी आपापसात डोकी फोडू नये म्हणणाऱ्या किती मराठी बांधवांना पटला असता? उलट 'बुळे' अशी त्यांची संभावना झाली नसती का?

शिवसेनेची आंतरिक सत्ता आणि ऊर्जा आता संपलेली आहे. आता त्यांना त्यांच्याच संस्कृतीच्या 'डीएनए'मधून आव्हान मिळतं आहे. इतिहासाचं चाक पूर्ण होतं ते असं. त्यावर कुणीही गळा काढू नये. शिवाय गळा काढण्याने इतिहासाचं चाक उलट फिरत नाही ते वेगळंच!

*rajuparulekar@hotmail.com*